GOODLUCK Page No.
Date

S.Y.B.A इतिहास
स्पेशल पेपर - I (S1)
सेमिस्टर - तिसरे (III)

# मध्ययुगीन भारत (सुलतानशाही - 1206-1526)

## प्रकरण - पहिले - सुलतानशाहीची स्थापना

(अ) सुलतानशाहीच्या इतिहासाची साधने
(ब) मोहम्मद घोरी - तुर्कींचे भारतावरील आक्रमण
(क) दिल्ली सुलतानशाहीच्या स्थापनेतील ऐबकचे कार्य
किंवा
भारतातील मुसलमानी साम्राज्यांचा संस्थापक या भूमिकेतून ऐबकचे कार्य

## प्रकरण दुसरे - दिल्लीचे प्रारंभीचे सुलतान व त्यांचे कार्य

(अ) अल्तमश (ब) रझिया (क) बल्बन

## प्रकरण तिसरे - सुलतानशाहीचा विस्तार (Expansion)

(अ) अल्लाउद्दीन खिलजीचा साम्राज्यविस्तार (उत्तर व दक्षिण भारत) व प्रशासकीय सुधारणा
(ब) महंमद तुघलक व त्याच्या योजना (Experiment) व फिरोजशहा तुघलक
(क) सय्यद व लोदी घराणे - सुलतानशाहीचा ऱ्हास

## प्रकरण चौथे - विजयनगर व बहामनी साम्राज्य

(अ) विजयनगर साम्राज्याच्या उदयाची कारणे - हरिहर, बुक्क, कृष्णदेवराय
किंवा
विजयनगर साम्राज्याचे प्रारंभीचे राजे - हरिहर, बुक्क, कृष्णदेवराय
(ब) बहामनीच्या इतिहासातील महंमद गवानचे कार्य
(क) बहामनी साम्राज्याच्या ऱ्हासाची कारणे

प्रकरण पहिले

Foundation of the Delhi Sultanate

प्रश्न 1 (a) Sources of Historiography of Medieval India

मध्ययुगीन भारताच्या इतिहासाची साधने

IMP - सुलतानशाहीची साधने

सुलतानशाहीची माहिती देणारे अनेक ग्रंथ फारसी आणी अरबी भाषेत लिहिलेले आहेत या ग्रंथांचे लेखक परकीय आहे

1. ताज-उल-मासिर - हा ग्रंथ हसन निझामी निझामीने लिहला. हा ग्रंथ गद्यात्मक व पद्यात्मक असून अरबी व पर्शियन भाषेचे मिश्रण आहे. ऐबक व अल्तमश या गुलाम घराण्यातील सुल्तानांचा इतिहास समजण्यास हा ग्रंथ उपयुक्त आहे
2. तबाकत-ए-नासिरी - मिनहाज-उस-सिराज हा या ग्रंथाचा लेखक होय. मुहंमद घोरीच्या भारतातील स्वाऱ्या आणि तुर्की साम्राज्याच्या स्थापनेपासून 1260 पर्यंतच्या इतिहासाची माहिती मिळते
3. किताब-उल-यामिनी - उत्बी याने या ग्रंथाची रचना केली आहे हा ग्रंथ अरबी भाषेत आहे. महंमद गझनीच्या लष्करी अभियानाची माहिती या ग्रंथात आहे.
4. तारीख-इ-अलाई - या ग्रंथाची रचना अमीर खुस्रो खुस्रो याने केली या ग्रंथात अल्लाउद्दिन खिल्जीच्या पहिल्या सोळा वर्षातील घटनांचे वर्णन केले आहे विशेषतः मलिक काफूरच्या दक्षिण स्वाऱ्यांची सविस्तर वर्णने त्याने दिली आहेत
5. तुघलकनामा - अमीर खुस्रोने हा ग्रंथ लिहिला या ग्रंथामध्ये गियासुद्दिन तुघलकाने सत्ता कशी मिळवली याचे वर्णन आहे.
6. तारीख-ए-फिरोजशाही - या ग्रंथाचा लेखक झियाउद्दिन बर्नी हा आहे. बल्बनपासून महंमद बीन तुघलक आणी फिरोजशाह तुघलकाच्या पहिल्या सहा वर्षांचा इतिहास त्याने या ग्रंथात दिला आहे.

(7) फुतुहाते फिरोजशाही — हा ग्रंथ स्वतः सुलतान फिरो
तुघलकाने लिहिला होता स्वतः च्या कारकीर्दीची माहिती
स्वतःच लिहिली असल्यामुळे या ग्रंथाचे महत्त्व विशेष आ

(8) तारीख-ए-मुबारकशाही — याह्या-बिन-अहमद सय्यद
याने हा ग्रंथ लिहिला इ.स. - 1400 ते 1434 पर्यंतचा सय्य
घराण्याचा इतिहास समजण्यास हे ~~एकमेव~~ उत्तम साध
आहे

(9) आशिकिया — अमीर खुसरोने हा ग्रंथ लिहिला गुजरातच्या
राजा कर्ण याची कन्या देवलराणी व अल्लाउद्दीनचा पुत्र
खिज्रखान या दोघांच्या प्रेमाची व विवाहाची कथा या
ग्रंथात आहे

(10) नूर सिपेहरनामा — हा ग्रंथ अमीर खुसरोने लि
कुतुबुद्दीन मुबारकशाहा याची युद्धे, वास्तूंची उभारणी
याच बरोबर भारतातील पशु पक्षी, निसर्ग, भाषा
आध्यात्मिक विद्या, धार्मिक रीतिरिवाज इ. उल्लेख या ग्रंथा
आहे

(11) फुतु-उस-सलातीन — ख्वाजा अब्दुल मलिक
इसामी याने हा ग्रंथ लिहिला महंमद गझनीपासून
महंमद बिन तुघलकपर्यंतच्या कालखंडाचे वर्णन केले आ

(12) तारीख-ए-अली — हा फारसी भाषेतील अली
भाषेतील ग्रंथ मोहम्मद उल-हुसैनीने लिहिला त्यात
अली आदिलशाहचा जन्म, राज्याभिषेक, मोगल-विजापू
युद्ध इ. हकीगत आहे

(13) अल्बेरुनीचा 'तहकिक-ए-हिंद' भाषा अरबी
भारतातील धर्म, तत्त्वज्ञान, साहित्य, चालीरीती, भूगो
ज्योतिष, देवता, कायदा, सणसमारंभ, उपवास, फल
ज्योतिष्य इ. लिखाण केले आहे

(14) उबाब-अल-जाखीरा — रजिउद्दीन-हसन-अस सिघान
याने हा ग्रंथ अरबी भाषेत लिहिला. एका वैज्ञानिक
शब्दकोशाचे लेखन त्याने केले त्या ग्रंथालाच 'उबाब-अ
जाखीरा असे म्हणतात

(15) हिदाया-अल-फिक — हा अरबी भाषेतील ग्रंथ
अहमद थानेसरी याने केले जौनपूरचा शासक इब्राहिम
याच्या कारकिर्दीत या ग्रंथाचे लेखन झाले (1401-14

16) किताब-उर-रेहला - हा ग्रंथ इब्नबतुताने लिहिला

भारतभेटीवर आधारित प्रवासवर्णन असलेला हा 'रेहला' ग्रंथ - भारताची भौगोलिक व सामाजिक स्थिती, अन्न पदार्थ, करमणुकीची साधने, स्त्रीजीवन, गुलामगिरी, विवाहसंस्था सतीपद्धत, व्यापार, दळणवळण, नाणी, सुलतानाचे सैन्य, न्यायदान, प्रांतीय प्रशासन इ. माहिती आहे

17) Book of ser Marcopolo - इटालियन प्रवासी मार्कोपोलो याने हा ग्रंथ लिहिला तो भारतात 1284 ते 92 या काळात प्रवासासाठी आला होता. याकाळचा व्यापार भारतीय जीवनपद्धती, आहार, वेशभूषा, परंपरा व श्रद्धा इ. माहिती आहे

18) पुरातत्वीय साधने - ① शिलालेख व ताम्रपट, नाणी सुलतानांची नावे, त्यांचा कार्यकाळ, राज्याच्या सीमा इत्यादी या साधनांचा उपयोग होतो उदा. राजस्थानमधील 15 व्या शतकातील कुंभलगड शिलालेखामधून तत्कालीन गावे, जिल्हे, पाठशाळा, भूदान, धर्मोत्सव इ. गोष्टींबद्दल माहिती मिळते. विजयनगरची माहिती मिळवण्यासाठी शिलालेख, ताम्रपट नाणी हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. शिलालेखांचा उपयोग राजकीय इतिहासासाठी होतो

नाणी - नाण्यांवरून तत्कालीन इतिहासावर प्रकाश पडतो. नाण्यांवर सुलतानाचे नाव, नाणे पाडलेले वर्ष, टांकसाळीचे शहर यांचा उल्लेख असतो. अल्तमशने प्रथम रुप्याची नाणी टंका पाडण्यास सुरुवात केली अल्लाउद्दीनने सोन्याची नाणी पाडली अल्लाउद्दीन स्वतःला 'खलिफाचा उजवा हात' म्हणून घेण्यास धन्यता मानतो हे त्याच्या नाण्यांवरून समजते. महंमद तुघलकाने सुरुवातीस खलिफांचे वर्चस्व झुगारून दिले होते नंतर मात्र त्याने पुन्हा नाण्यांवर खलिफाचे नाव घालण्यास सुरुवात केली नाण्यांवरून राजाचे नाव, देवदेवतांची चिन्हे बिरुदावली यावरून त्यांचा राज्यविस्तार, धार्मिक श्रद्धा याविषयी माहिती मिळते

स्मारके - पुरातत्वीय साधनांमध्ये स्मारकांचा ही समावेश होतो स्मारकावरून तत्कालीन काळाच्या प्रसिद्ध स्मारके उभारणाऱ्या राज्यकर्त्यांची कला विषयक आवड आणि ज्ञान इ. माहिती मिळते उदा. कबरी, मशिदी, मिनार इ.

## प्रश्न-(२) मुहंमद घोरी [1173 ते 1206]

1173 मध्ये गझनीच्या गादीवर मुहंमद घोरी पदारूढ झाल्यामुळे गझनीवर घुरवंशाची सत्ता स्थापन आणि नंतर घोरीने भारताकडे मोर्चा वळवीला

★ उद्देश — भारतात साम्राज्यविस्तार करावा, आपले साम्राज्य सुरक्षित करावे, भारतातील संपत्ती लुटावी, भारतात इस्लामधर्माचा प्रसार करावे इ.

★ मुहंमद घोरीच्या आक्रमणवेळची भारताची राजकिय परिस्थिती

अजमेर व दिल्ली — चौहानवंश — अजमेर व दिल्लीवर पृथ्वीराज चव्हाण हा पराक्रमी राजा राज्य करीत होता. पृथ्वीराजशी कनोजच्या जयचंदाचा कलह सुरू होता. 1191 मध्ये तराईच्या पहिल्या लढाईत पृथ्वीराजने मु. घोरीचा पराभव केला पुढे तराईच्या दुसऱ्या लढाईत 1192 मध्ये घोरीने पृथ्वीराजचा पराभव करून त्याला ठार केले. टेम्पूल म्हणतो 'पृथ्वीराज हा अद्वितीय पराक्रमी पुरुष होता'. पृथ्वीराजने तराईच्या मैदानात मु. घोरीचा पराभव केला घोरीला घायाळ केले पण थोडक्यात वाचला.

तराईच्या विजयानंतर मु. घोरीने स्वामिनिष्ठ गुलाम ऐबक अजमेरमध्ये (मध्यभारतात) शिरला त्याने तेथील अनेक मंदिरे पाडून मशीद उभारली तिला 'अढाई दिनका झोपडा' असे म्हणतात पुढे ऐबकने हांसी, मीरत, दिल्ली, अजमेर रणथंभोर इ. रजपूत राज्य काबीज केली.

मु. घोरीने पृथ्वीराजाच्या पुत्राशी सख्य वाढवून करून त्याचे अजमेरचे राज्य त्याला परत दिले. नंतर ऐबकाकडे जिंकलेल्या प्रदेशाचा कारभार सोपवून घोरी स्वदेशी गेला. भारताच्या इतिहासात तराईचे दुसरे युद्ध अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे रजपुतांची शक्ती क्षीण होऊन भारतात मुस्लीम साम्राज्य स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला.

घोरीला पुत्र नव्हता त्याच्या मृत्यूनंतर (15 मार्च 1206) त्याचे साम्राज्य त्याच्या गुलामांनी वाटून घेतले भारतीय प्रदेशात मु. घोरीचा गुलाम ऐबकने आपल्या गुलामवंशाची सत्ता स्थापन केली (1206)

## प्रश्न - ③ कुतुबुद्दीन ऐबक [1206 - 1210]

(1) पुर्वचरित्र - भारतातील सुल्तानशाहिचा संस्थापक ऐबक याचा जन्म तुर्कस्थानमध्ये तुर्की मातापित्यांच्या पोटी झाला ऐबक दिसायला कुरूप होता पण होतकरू, परिश्रमी, व बुध्दीवान होता. बालपणीच त्याला निशापूरच्या काझी फरवरूद्दीन यास गुलाम म्हणून विकण्यात आले काझीने ऐबकाचे पुत्राप्रमाणे पालन करून आवश्यक विद्या व कलेंचे शिक्षण दिले. एवढेच नव्हे तर त्याचा कल पाहून त्यास युध्दकलेचे शिक्षण दिले. काझीच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांनी ऐबकाला महम्मद घोरीला विकले.

(2) महंमद घोरीचा भारतातील प्रतिनिधी [-1192 ते 1206]

ऐबक आपल्या कर्तबगारीमुळे लवकरच महम्मद घोरीचा अत्यंत आवडता गुलाम झाला. ऐबकाने घोरीबरोबर अनेक युध्दात भाग घेतला. पृथ्वीराज चव्हाणाबरोबर झालेल्या तराईनच्या युध्दात (1192) ऐबकाने चांगलाच पराक्रम गाजविला त्यामुळे घोरीने आपल्या भारतीय प्रदेशाचा प्रतिनिधी (राज्यपाल) म्हणून ऐबकाचे नियुक्ती केली त्यानंतर ऐबकाने अजमेर, दिल्ली, मीरत, कालिंजर अलीगड इ. उत्तर भारतातील प्रदेश काबीज केले. व संपूर्ण उत्तर भारत घोरीच्या स्वामित्वाखाली आणला

(3) सिंहासन प्राप्ती [24 जून 1206] -

ऐबकाचा स्वामी महंमद घोरी भारतातून परत जाताना मार्गामध्येच त्याला खून झाला त्यामुळे त्याचे ठिकठिकाणचे गुलाम प्रतिनिधी स्वतंत्र सुल्तान बनले. ऐबकही स्वतंत्र शासक बनला पण त्याने स्वतःला सुल्तान ही पदवी घेतली नाही. फक्त मलिक आणि सिपाहसालार या पदव्यात समाधान मानले. आपली नाणी पाडली नाही किंवा स्वतःच्या नावाने खुत्बा वाचविला नाही. कारण तो स्वतःला महंमद घोरीचा प्रामाणिक सेवक समजत असे

पुढे 1208 मध्ये घोरीचा सुल्तान

गियासुद्दीन मोहम्मद घोरीने त्याला राजचिन्हे निशाण व पोशाख पाठवून 'सुलतान' ही पदवी दिली.

## (4) सामर्थ्यवृद्धीसाठी विवाहसंबंध —

राज्याभिषेकानंतर ऐबकने सामर्थ्यवान सरदारांशी वैवाहिक संबंध प्रस्थापित करून आपले आसन स्थिर करण्याचा प्रयत्न केला.

(1) ऐबकाने गझनीच्या एल्दोजच्या मुलीशी स्वतः विवाह केला.

(2) आपली मुलगी अल्तमश नामक सरदारास दिली.

(3) ऐबकाने आपल्या बहिणीचे लग्न नासुरूद्दीन कुबाचाशी लावून दिले.

## (5) ऐबकाचे विजय (1206 ते 1210)

राज्यप्राप्तीनंतर ऐबकाने अनेक शत्रूंचे दमन करून आपले राज्य शक्तीशाली बनविले —

### (1) गझनीचा एल्दोजचा पराभव

गझनीचा शासक आलेज एल्दोज हा अत्यंत महत्त्वाकांक्षी होता. त्याने लाहोर जिंकण्याचा प्रयत्न केला. पण ऐबकाने एल्दोजचा पराभव करून गझनी शहर काबीज केले.

### (2) बंगालवर प्रभुत्व —

बंगालमधील बंडाचा बंदोबस्त करून अलिमर्दनखान यास बंगालच्या राज्यपाल (सुभेदार) नेमले.

### (3) रजपूत राज्यांशी संघर्ष

ऐबक उत्तर सुलतानाशी लढण्यात गुंतला आहे हे पाहून रजपूत राजांनी स्वतःच्या पुकारले तुर्कांनी कर देणे बंद केले उदा. जयचंद राजाचे वारस पूर्व बंगालमधील सेन वंशाचे राजे इ. ऐबकाकडून रजपूतांचे पूर्ण दमन होऊ शकले नाही.

## (6) ऐबकाची योग्यता किंवा मूल्यमापन

इ.स 1210 मध्ये ऐबक घोड्यावरून पडून मृत्यू पावला 1206 ते 1210 या 4 वर्षाच्या काळात त्याने शासन केले

या ४ वर्षांच्या कालखंडात राजकीय प्रतिकूलता असल्याने त्याला भारतात नवे प्रदेश जिंकता आले नाहीत. तो कुशल सेनापती होता त्याचा काळ युद्धमोहिमांमध्ये धामधुमीत गेला त्यामुळे त्याला प्रशासनातील सुधारणा, न्यायव्यवस्था याकडे लक्ष देता आले नाही म्हणजे एकूण भारतात कार्यक्षम प्रशासनाची निर्मिती करू शकला नाही

तो वास्तुकला व विद्या यांचा प्रेमी होता त्याने मुस्लीम संतांच्या स्मरणार्थ दिल्ली येथे कुतुबमीनारची उभारणी केली. पण हे काम त्याच्या मृत्यूमुळे पूर्ण होऊ शकले नाहि अल्तमशने ते काम पूर्ण केले. तसेच दिल्ली येथे कुव्वत-उल-इस्लाम ही मशिद उभारली. दानधर्म करण्यात त्याचा लौकिक होता त्याच्या दरबारात अनेक कवी व विद्वान होते. अज्ञातवास व दारिद्र्यातून सत्ता व प्रतिष्ठेस पोहोचणारा सामान्य सैनिक होता. तो लाखबक्ष म्हणजे लाखोंना दान देणारा होता. गोरगरीबांना लाखो रुपयांचा दानधर्म करणाऱ्या ऐबकास लखबक्ष म्हणतात हसननिजामी व फखरेमुदीर हे विद्वान त्याच्या पदरी होते असे असले तरी त्याने मुलकी किंवा प्रशासकीय सुधारणा केल्या नाहित

---